नि.दि.दा.क्र.१२५/२०१२

नि.क्र.१५८

<u>उलट तपास वादीकरिता विधीज्ञ श्री.जी.आर.साळूंके यांच्या वतीने पुन्हा शपथेवर सुरू</u>

१३. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल माधव यांच्या मृत्यूप्रमाणपत्रावर वेगळे नाव असून दावा जमीनीच्या ७/१२ उता-यावर वेगळे नाही. माझ्या नावासमोर 'दिवे' हे आडनाव रामाने माधव यांना दत्तक घेतल्यामुळे लागले. रामाने माधव यांना दत्तक घेतल्याबाबतचे दत्तकपत्र झाले होते. ते दत्तकपत्र मी या दाव्यात दाखल केलेले नाही. ते दत्तकपत्र मी दाखल करू शकत नाही. साक्षीदार स्वत: सांगतात की, तो दत्तकपत्र सुमारे ७० वर्षांपूर्वी झाला होता आणि ब-याच ठिकाणी शोध घेऊनही त्यांना सापडलेले नाही. ते दत्तकपत्र सन-१९२९ सालच्या गुडीपाडव्याच्या दिवशी झाले होते. ते दत्तकपत्र मी पाहिलेले नाही.

१४. हे म्हणणे खरे नाही की, माधवच्या नावापूढे त्यांच्या वडिलांचे नाव म्हणून रामा दिवे हे फक्त ७/१२ उता-यावर आहे आणि असे नाव ईतर कोणत्याही दस्तावर नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे माधव यांच्या सर्व शासकीय कागदपत्रांवर त्यांच्या वडिलांचे नाव रामा दिवे असल्याचे नमूद आहे. ते कागदपत्र मी पुढील तारखेला दाखल करू शकतो.

<u>कागदपत्र दाखल करण्याकरीता उलट तपास तहकूब करण्यात आला</u>.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.03.29 13:16:17 +0530

(आशिष बि. मरलेचा)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर

दिनांक २८/०३/२०२५.